सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४००००१, दू.०२२-२२६२०२३१/३२,

Website-www.doa.maharashtra.gov.in Email ID: direrectorateofart@gmail.com

---

दिनांक:- 05 SEP 2025

**प्रसिध्दीपत्रक**

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रम रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया**

------

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता १ वर्ष, २ वर्ष व ३ वर्ष कालावधीच्या प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रमांसाठी शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विना अनुदानित कला संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतर रिक्त जागांसाठी प्रवेश घेण्याकरीता **" दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ ते २९ ऑगस्ट, २०२५"** या कालावधित प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली.

शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विना अनुदानित कला संस्थांमध्ये प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, प्रवेश घेण्याकरीता विद्यार्थ्यांना शेवटची संधी म्हणून **" मंगळवार दिनांक ९ सप्टेंबर, २०२५"** रोजी संबंधित कला संस्थेत मुळ कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या प्रवेश प्रक्रियेकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी https://doaonline.co.in/DIP२५/ या लिंकवर जाऊन New Application वरुन विहित कालावधीत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे. तसेच रजिस्ट्रेशन केलेल्या आवेदन पत्राची प्रत व मुळ कागदपत्रांसह संबंधित संस्थेत प्रवेशासाठी वरील कालावधीत उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थांकडून दिलेल्या सूचनांचे /आदेशांचे पालन करावे.

संबंधित कला संस्थांनी रिक्त जागांवर शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार https://doaonline.co.in/DIP२५/ या लिंकवर जाऊन College login वरुन विहित कालावधीत ऑनलाईन नोंदी करुन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. ज्या संस्था उक्त कालावधीत विहित पध्दतीने संस्थेत प्रवेश प्रक्रिया राबविणार नाहीत, त्यांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाहीत, याची सर्व प्राचार्य व कला संस्थांनी नोंद घ्यावी.

(डॉ.किशोर इंगळे)

कला संचालक,

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई